# देवगिरी मिरर

• संपादक : राम गंगाराम तरटे •

• साप्ताहिक • नांदेड • वर्ष १ ले • अंक ८ वा • बुधवार, दिनाक १४ जानेवारी २०२६ • RNI No. -MHMAR/25/A2579 • पाने ४ • किंमत : २ रुपये

• Weekly • Nanded • Year - 01 • Issue No. 08 • wednesday, Date 14 Janewari 2026 • RNI No. -MHMAR/25/A2579 • Page 4 • Price : 2 ₹


# मनपातील भ्रष्टाचाराची दुर्गंधी साफ करण्यासाठी शिवसेनेला विजयी करा : ना.उदय सामंत




नांदेड : नांदेड महापालिकेत गेल्या पन्नास वर्षापासून ज्यांची सत्ता होती त्यांनी नांदेडचा विकास केला नाही. त्यामुळे नांदेडमध्ये दुर्गंधी आणि डुकरांचा सुळसुळाट होता असे वक्तव्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेडमध्ये एका सभेमध्ये केले होते. ज्यांनी महानगरपालिकेत भ्रष्टाचाराची दुर्गंधी केली अविकासाची दुर्गंधी केली. त्यांना सत्तेतून हाकला आणि दुर्गंधी साफ करून विकास करण्यासाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री तथा शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी आज केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी आज राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांची कॅनल रोड येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या जाहीर सभेत ते बोलत होते. आ.बालाजीराव कल्याणकर, शिवालयाच्या अध्यक्षा सौ. संध्याताई कल्याणकर, शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख मंगेश कदम, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अपर्णा नेरलकर, यांच्यासह नांदेड उत्तर मधील शिवसेनेचे सर्व उमेदवार यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नाव न घेता खा. अशोकराव चव्हाण आणि आतापर्यंतच्या त्यांच्या एकूण राजकीय विकासात्मक भूमिकेचा खरपूस समाचार घेतला. जर राज्याचे मुख्यमंत्रीच म्हणत असतील की नांदेडचा विकास गेल्या ७० वर्षात येथील नेतृत्वाने केला नाही तर मग ते नेतृत्व कोणते आहे आणि त्यांनी का विकास केला नाही याचा विचार करण्याची वेळ आहे . जर तुमच्या मतावर निवडून यायचे महानगरपालिकेच्या शासकीय जागा खाजगी गुत्तेदाराच्या घशात घालायच्या . विकासाच्या नावावर पुन्हा सत्ता मिळवायची आणि जनतेला वाऱ्यावर सोडायचे ही भूमिका घेणाऱ्यांना आता सत्तेतून बाहेर हाकला. त्यांनी केलेली अविकासाची घाण आणि दुर्गंधी काढण्यासाठी शिवसैनिक सज्ज आहेत. त्यामुळे शिवसेनेला सत्तेत पाठवा . नांदेड महानगरपालिकेच्या विकासाची जबाबदारी उपमुख्यमंत्री भाई एकनाथ शिंदे यांची राहील अशी ग्वाही देतानाच ते म्हणाले, आ. बालाजीराव कल्याणकर यांची महानगरपालिकेत सत्ता नसतानाही त्यांनी महानगरपालिका क्षेत्रात जवळ जवळ पंधराशे कोटी रुपयांची कामे केली आहेत. जर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता आली तर विचार करा किती रुपयाचा निधी प्राप्त होईल आणि नांदेड महानगरपालिकेचा विकास कसा होईल.

पान ४ वर ➢

### सांगवीच्या अपक्ष महिला उमेदवाराला शिवसेनेचा पाठिंबा नाहीच

नांदेड मधील प्रभाग क्रमांक तीन सांगवी येथून एक अपक्ष महिला उमेदवार शिवसेनेच्या नेत्यांचे फोटो लावून निवडणुकीला सामोरे जात आहे. परंतु शिवसेनेचा कोणताही पाठिंबा त्या महिला उमेदवाराला नाही. शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री भाई एकनाथराव शिंदे यांनी ज्यांना धनुष्यबाण ही निवडणूक निशाणी दिली आहे तेच आपले अधिकृत उमेदवार आहेत. फक्त रिक्षा या निवडणूक निशाणीला आपण दोन ठिकाणी पुरस्कृत केलेले आहे . अन्य कुठल्याही अपक्ष उमेदवाराला शिवसेनेचा पाठिंबा नाही . त्यामुळे पदाधिकाऱ्यांनी आणि मतदारांनी संभ्रमात न राहता फक्त आणि फक्त धनुष्यबाणा समीरचे बटण दाबून शिवसेनेले प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.



# नांदेडच्या विकासाची ब्ल्यूप्रिंट तयार आहे

## खा.अशोकराव चव्हाण : मनपात सत्ता देण्याचे आवाहन

नांदेड : भारतीय जनता पार्टी या निवडणुकीत संकल्पनाम्यातून शहराच्या विकासाचा रोडमॅप आम्ही दिला आहे. भाजपकडे विकासाचे व्हिजन आहे. त्यामुळे नांदेडचा विकास केवळ भाजपच करू शकतो त्यामुळे नांदेड महानगर पालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले आहे.

मनपा निवडणुकीत वसरणी, हनुमान गड, नवा मोंढा, चिखलवाडी, सिडको येथील जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री डी. पी. सावंत, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, बाळासाहेब पांडे, बी. आर. कदम, बालाजी पुयड, बालाजी बच्चेवार, किशोर स्वामी, एकनाथ पवार, शीतल खांडील, प्रशांत तिडके, उमेश मंठाळकर, आनंद वच्छेवार, गणेश झोळगे, संदीप यशवंतकर, गणेश बोडखे, दिनेश लक्षटवार आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की , शहर सुंदर व सुशोभित असावे पण त्यासोबतच ते सुरक्षित असावे याकडे आमचे लक्ष आहे. आमच्या संकल्पनाम्यात दिलेल्या बहुतेक वचनांची आम्ही पूर्तता करणार आहोत. माझ्यावर वैयक्तिक टीका करण्यापलीकडे विरोधकांकडे दुसरा कोणताही मुद्दा नाही. विरोधकांची तोंडे परस्परविरोधी दिशेला आहेत. हे शहर सहज चुकीच्या माणसांच्या हाती देणे म्हणजे विकासाला ब्रेक लावणे होय. लोकसहभाग व शासन यांचा समन्वय अत्यंत आवश्यक असतो. देशात आणि राज्यात भाजपाचे सरकार असल्यामुळे नांदेडमध्ये विकास खेचून आणण्यासाठी महापौर भाजपाचा झाला पाहिजे. या शहराच्या पुढच्या ५० वर्षांचे नियोजन करायचे आहे. विकसित भारतात विकसित महाराष्ट्र व विकसित महाराष्ट्रात विकसित नांदेड निर्माण झाले पाहिजे यावर आमचा भर असेल. शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पावले उचलणार. मागील ५० वर्षांपासून ज्यांनी सरकारी जागेवर घरे बांधली

पान ४ वर ➢

## आ.आनंदराव बोंढारकर यांचे आवाहन


# नांदेड दक्षिण विधानसभेप्रमाणेच महापालिकेवर भगवा फडकवा



नांदेड : नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघावर ज्याप्रमाणे आपण शिवसेनेचा भगवा फडकवलात आता त्याचप्रमाणे आणि त्याच विश्वासाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा सन्मानाने भडकवा. दक्षिण नांदेड मधील प्रत्येक प्रभागाचा विकास करण्याची जबाबदारी आमची राहील असा विश्वास आमदार आनंदराव बोंढारकर यांनी आज दिला.प्रभाग क्रमांक १५ मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते बोलत होते.

पुढे बोलताना आ.आनंदराव बोंढारकर म्हणाले, भारतीय जनता पार्टीने युती तोडल्याने आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबत युती केली आहे . समविचारी पक्षासोबत युती करून या भागातील जनतेच्या विकासाचा आमचा संकल्प आहे. त्यामुळे नांदेड दक्षिण भागातील शिवसेनेच्या आणि राष्ट्रवादीच्या प्रत्येक उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा. असे आवाहनही आमदार बोंढारकर यांनी यावेळी केले.

प्रभाग क्रमांक १५ मधील शिवसेनेचे उमेदवार सुंदरलाल किसनलाल गुरुखुदे, तुलजेश यादव, ब-सौ.पूजा किशनराव फटाले, क-सौ.निलम सुंदरलाल गुरुखुदे, ड-सत्यजित दिलीप डोईफोडे यांच्यासह मंत्री जयप्रकाश मुंदडा, डॉ.जुगलकिशोर धूत, शिवसेना नगरसेवक व गट नेता (हदगाव) गोपालभाऊ सारडा, युवासेना जिल्हाप्रमुख बाळु पाटील मोरे, तालुकाप्रमुख संजय पाटील कुरे यांच्यासह राजस्थानी माजी समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




# नांदेड महापालिकेत राष्ट्रवादीच्या हाती सत्ता द्या

## अजित दादांच्या नेतृत्वात शहराचा विकास आम्ही करू : सुनील तटकरे



नांदेड : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे हाती सत्ता द्या हाती शहराचा विकास अजित दादांच्या नेतृत्वात सर्वांगीण केला जाईल पुणे बारामतीच्या धरतीवर नांदेड महानगरपालिका महाराष्ट्रातील सर्वात सुंदर आणि विकसित शहर होईल असा विश्वास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केला नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारात आज आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ साईवावा मंदिर तरोडा बु.कॅनॉल रोड, येथे शुक्रवारी जाहीर सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. सभेत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या जाहीरनाम्याचे प्रकाशन प्रदेशाध्यक्ष, खा. सुनील तटकरे, राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षा तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्यासह व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. पुढे बोलताना खा. तटकरे म्हणाले, अनेक वर्ष येथील नेत्याने महापालिकेची सत्ता आपल्या ताब्यात ठेवली परंतू नांदेड शहराचा म्हणावा तशा विकास केला नाही. यापुढे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात नांदेडचा प्राधान्याने विकास करण्यात येईल. विविध शासकीय योजना शहरात आणल्या जातील, यासाठी महापालिकेत राष्ट्रवादी पार्टीची सत्ता स्थापन करण्यासाठी सर्व उमेदवारांनी विजयी करावे असे आवाहन केले.

सभेला माजी आमदार तथा राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, अविनाशराव घाटे, सुभाषराव साबणे, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### जि.प.च्या निवडणुका पुढे ढकलल्या

नवी दिल्ली (प्रतिनिधी) महापालिका निवडणुकांनंतर राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होणार असून राज्याचे लक्ष तिकडे लागलं आहे. मात्र, निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत निवडणुकांसाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केली होती. अखेर, राज्य निवडणूक आयोगाला सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला असून जिल्हा परिषद निवडणुकांसाठी दोन आठवड्यांची मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे. राज्यातील जिल्हा परिषद जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ द्या, असा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडून सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आला होता.

### ट्रम्प लवकरच भारत दौऱ्यावर?

नवी दिल्ली : भारत आणि अमेरिका यांच्यातील बिघडलेले राजनैतिक संबंध सुधारण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल पडत आहे. अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जियो गोर यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प लवकरच भारताचा दौरा करण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ट्रम्प यांच्यातील घनिष्ट मैत्रीमुळे हा दौरा जागतिक राजकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.


# मतदारांना मतदानासाठी सुट्टी

नांदेड ( प्रतिनिधी) : नांदेड वाघाळा महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदानासाठी सदर क्षेत्रातील मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी सुट्टी अथवा दोन ते तीन तासांची सवलत देण्यात येणार आहे.

त्यानुसार मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे.

ही सुट्टी सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहील. जसे राज्य शासन, केंद्र शासन व खाजगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदीसाठी लागू राहणार आहे.

# कॉंग्रेसशी बेइमानी करणाऱ्यांना अद्दल घडवा



खा.रवींद्र चव्हाण यांचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)- प्रत्येक निवडणुकीत नांदेडच्या जनतेने कॉंग्रेसच्या बाजुने कौल दिला आहे. कॉंग्रेसच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास असून यावेळीही तो कायम राहणार यात शंका नाही. सत्तेची स्वप्ने पाहणार्या विरोधकांनना मतदार निश्चितच हिसका दाखवतील, असा विश्वास खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी व्यक्त केला.

नांदेड महानगर पालिका निवडणुकीतील परभाग क्र.११, १३ व १५ मधील कॉंग्रेस-वंचित आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ ठिकठिकाणी आयोजित प्रचारसभेत खा.चव्हाण यांनी विरोधकांनी त्यांच्या जाहीरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची खिल्ली उडवली. ते म्हणाले, कॉंग्रेस कार्यकाळातच झालेल्या कामांचा उल्लेख त्यांनी आपल्या जाहीरनाम्यात केला आहे. आमच्याकडे व्हीजन असल्याचा आव आणणार्यांनी जनतेची दिशाभूल करू नये. महायुतीतील तिन्ही पक्ष एकमेकांविरुद्ध कुरघोडी करीत आहेत.

पान ४ वर ➢

# मनपाचे भूखंड गिळणाऱ्या टोळीला पराभूत करा!

## ना.हेमंत पाटील, आ.चिखलीकरांचे मतदारांना संयुक्त आवाहन

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड दक्षिण भागातील महानगरपालिकेच्या निवडणुकीत उभे असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादीचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर, शिवसेनेचे विधान परिषदेचे गटनेते ना. हेमंत भाऊ पाटील यांनी संयुक्तरीत्या केले आहे.

नांदेड महानगरपालिका प्रभाग क्रमांक २० मधील शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युतीचे अधिकृत उमेदवारांच्या प्रचारा निमित्त सिडको येथील कुबेरेश्वर धाम महादेव मंदिर दत्तनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर , नामदार हेमंत पाटील यांच्यासह आमदार आनंदराव पाटील बोंढारकर आदींची उपस्थिती होती.

प्रभाग क्रमांक २० मधील अ – अनुसूचित जाती महिला उमेदवार सौ.संघमित्रा डि.के.कांबळे ह्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

आणि ब– ओबीसी महिला उमेदवार योगिता अमोल येरगेवार , क– ओबीसी उमेदवार संतोष महादेवराव कांचनगिरे, ड– सर्वसाधारण महिला रेखाताई विनायकराव आकुरके, ई– सर्वसाधारण उमेदवार विनय विश्वंभरराव पाटील गिरडे हे उमेदवार शिवसेना धनुष्यबाण या चिन्हावर निवडणूक लढत आहेत. या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन दोन्ही नेत्यांनी केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमध्ये ज्यांच्या हाती सत्ता होती. त्यांनी शहरातील सर्व जमिनी विकून टाकल्या आहेत. शासकीय जमिनी गुत्तेदाराच्या घशात घालून मोठ्या प्रमाणात पैसा कमवला आहे. आता नांदेडमध्ये साधे शौचालय बांधण्यासाठी सुद्धा महानगरपालिकेकडे स्वतःची जागा उरली नाही. सिडको आणि हडको भागातील उर्वरित मैदानावर त्यांचा डोळा आहे . त्यामुळे या भागाला या टोळी पासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांना विजयी करा. ही जबाबदारी आता तुमची आहे. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. फक्त तुम्ही शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे हाती सत्ता द्या. सिडको आणि हडको भागाचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी आम्हा तिघांचीही असेल अशी ग्वाही यावेळी मान्यवरांनी दिली.



### नांदेडची लाज घालवली: आ.चिखलीकरांचा प्रहार

गेल्या ७० वर्षापासून नांदेडची सत्ता ताब्यात ठेवूनही शहराचा विकास झाला नाही . याला नांदेडचे नेतृत्व जबाबदार आहे. अशी जहरीली टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. आपल्या वडिलांचा अपमान होतानाही ही नेते मान खाली घालून बसले होते. याचा अर्थ भारतीय जनता पार्टीमध्ये त्यांची पत आणि प्रतिष्ठा उरलेली आहे. त्यामुळे नांदेडमध्ये अविकासाची दुर्गंधी करणाऱ्यांना आता सत्तेतून उचलून बाहेर फेका. महापालिकेच्या जागांवर डोळा ठेवून असलेल्या या बोक्यांना सत्तेतून हाकलून द्या आणि नांदेडच्या खऱ्या विकासासाठी राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून द्या असे आवाहन आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

> बुडतां हे जन न देखवे डोळां ।
> येतो कळवळा म्हणउनि ॥

# एक मत लोकशाहीसाठी...

लोकशाही ही मोफत मिळालेली देणगी नाही; ती जपावी लागते, टिकवावी लागते आणि वेळोवेळी सिद्धही करावी लागते. मतदान हा लोकशाहीचा आत्मा आहे. मात्र दुर्दैवाने आज हाच आत्मा उदासीनतेने गुदमरतो आहे. नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न अत्यंत गंभीरपणे विचारात घेण्याची वेळ आली आहे.

नांदेड शहरातील खड्डेमय रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, कचऱ्याचे ढिगारे, आरोग्य सेवांचा अभाव, अनियंत्रित अतिक्रमण, बेरोजगार युवकांची वाढती संख्या , या सगळ्यांवर नागरिक वर्षानुवर्षे संताप व्यक्त करत आहेत. मात्र निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र ओस पडतात. पैसे मिळाल्याशिवाय मतदार मतदान करण्यासाठी घराबाहेर पडत नाहीत. ही वस्तुस्थिती अंगावर काटा आणणारी आहे. मतदान न करणारा नागरिक हा व्यवस्थेतील अपयशाचा भाग ठरतो. हे कटू पण अपरिहार्य सत्य आहे.

महानगरपालिका म्हणजे केवळ नगरसेवकांची बैठक नाही; ती शहराच्या विकासाची दिशा ठरवणारी सर्वोच्च नागरी संस्था आहे. येथे घेतले जाणारे निर्णय पुढील पाच वर्षे नांदेडकरांच्या जीवनावर परिणाम करतात. अशा महत्त्वाच्या निवडणुकीत मतदान न करणे म्हणजे शहराचा कारभार काही मोजक्या लोकांच्या हाती सोपवणे होय. आणि मग त्याच लोकांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयांवर टीका करण्याचा नैतिक अधिकारही आपण गमावतो. आजही अनेक मतदार जात, धर्म, पैसा, दारू, अफवा आणि खोट्या आश्वासनांच्या आहारी जाताना दिसतात. ही मानसिक गुलामगिरी नांदेडच्या प्रगतीला सर्वात मोठा अडथळा आहे. विकासाचा विचार न करता दिलेले मत म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. लोकप्रतिनिधी निवडताना त्यांची पार्श्वभूमी, कामाचा अनुभव, प्रामाणिकपणा आणि लोकहिताची बांधिलकी तपासणे हे मतदाराचे कर्तव्य आहे. उपकार नाही.

एक मत काय बदलणार? हा प्रश्न विचारणाऱ्यांनी लक्षात ठेवावे की हजारो मतदारांनी असेच विचार केले तर लोकशाही कोसळायला वेळ लागत नाही. मतदान न करणे म्हणजे भ्रष्टाचार, निष्क्रिय प्रशासन आणि अपयशी नेतृत्वाला थेट परवानगी देणे आहे. ही परवानगी देऊन नंतर रस्त्यावर उतरून आंदोलन करणे हा केवळ ढोंगीपणा ठरतो. अशा लोकांकडून लोकशाहीचे रक्षण होत नाही. समाजाचे हित होत नाही. शहराचा विकास होत नाही.

नांदेडचा तरुण वर्ग विशेषतः जबाबदार आहे. सोशल मीडियावर क्रांतीचे पोस्ट टाकणारे युवक मतदानाच्या दिवशी झोपेत असतील, तर ती क्रांती केवळ शब्दांपुरतीच राहील. खऱ्या बदलाची सुरुवात मतदान केंद्रातून होते, मोबाईल स्क्रीनवरून नाही.

आता निर्णायक क्षण आला आहे. घराबाहेर पडायचे की घरात बसून पुढील पाच वर्षांची कुचंबणा स्वीकारायची, हा प्रश्न प्रत्येक नांदेडकरासमोर आहे. मतदान हा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकीच ती जबाबदारी आहे. आज जर आपण ती जबाबदारी झटकली, तर उद्या आपले प्रश्न ऐकून घेणारेही कोणी उरणार नाही. म्हणूनच स्पष्ट सांगायला हवे, नांदेड मनपासाठी मतदान करा. गप्प बसू नका. उदासीनता झटकून टाका. कारण जो मतदान करत नाही, त्याला तक्रार करण्याचाही अधिकार नाही. लोकशाही बळकट करा, नाहीतर तिच्या ऱ्हासाला आपणच कारणीभूत ठरू. हे टाळायचे असेल तर चला मतदानाचा अधिकार वापरू आणि लोकशाहीला अधिक बळकट करू..

## मकर संक्रांती

मकर संक्रांती हा जानेवारी महिन्यात साजरा केला जाणारा हिंदूंचा प्रमुख सण आहे. हा मुख्यतः जानेवारी महिन्याच्या १४ किंवा १५ तारखेला साजरा केला जातो. जेव्हा सूर्य दक्षिणायन ते उत्तरायण मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकर संक्रांतीचा सण साजरा केला जातो. या दिवसापासून वर्षातील सणांची सुरुवात होते असे मानले जाते. देशातील विविध राज्यांमध्ये याला वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. पंजाब आणि हरियाणामध्ये लोहरी, पश्चिम बंगालमध्ये उत्तर संक्रांती, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमध्ये उत्तरायण किंवा खिचडी, आंध्र प्रदेश, केरळ आणि कर्नाटकमध्ये संक्रांती, तमिळनाडूमध्ये पोंगल आणि आसाममध्ये बिहू म्हणून ओळखले जाते.

मकर संक्रांती हा सण पिकांच्या चांगल्या उत्पादनासाठी देवाचे आभार मानण्यासाठी आणि शेतकऱ्यांवर सदैव कृपा ठेवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी शेतीत वापरल्या जाणार्या नांगर, कुदळ, बैल इत्यादींची पूजा केली जाते आणि शेतकर्यांवर देवाची कृपा सदैव राहावी यासाठी सूर्यदेवाची पूजा केली जाते.

हिंदूंच्या मुख्य सणांपैकी एक मकर संक्रांतीचा हा सण जानेवारी महिन्यात १४ किंवा १५ तारखेला मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू दिनदर्शिकेनुसार पौष महिन्यात जेव्हा सूर्य दक्षिणायन ते उत्तरायण म्हणजेच मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा मकर संक्रांतीचा हा सण साजरा केला जातो. देशाच्या विविध भागांमध्ये इतर नावांनी साजरा केला जातो, परंतु सर्वत्र सूर्याची पूजा केली जाते.






नवीन इंग्रजी वर्षाची सुरुवातच मकर संक्रांतीसारख्या हिंदू सणाने होते.

मकर संक्रांती सणाला धार्मिक,भौगोलिक, वैज्ञानिक आणि आरोग्यदृष्ट्या खूप महत्त्व आहे.

मकरसंक्रांत हा भारतातील पौष महिन्यात येणारा एक शेती संबंधित सण आहे. सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे. भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती असल्यामुळे या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण एकमेकांना स्त्रिया देतात. हरभरे, ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाणघेवाण करतात. हा सण जानेवारीतील हिंदू पंचांगाप्रमाणे पौष महिन्यात येतो. संक्रांती म्हणजे 'हस्तांतरण' होय, ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्याशी सुसंगत सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. दरवर्षी २१-२२ डिसेंबरला सूर्याची किरणे पृथ्वीच्या साडेतेवीस दक्षिण या अक्षांशावर लंबरूपात पडतात आणि त्या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरू होते. त्यामुळे साडेतेवीस दक्षिण या अक्षवृत्ताला मकरवृत्त म्हणू लागले. पृथ्वीच्या परांचन गतीमुळे सूर्याच्या मकरसंकरमणाची तारीख पुढेपुढे जात राहिली आणि साहजिकच या सणाची तारीख बदलत राहिली.

सूर्याच्या मकर राशीतील प्रवेशाचा तो पहिला दिवस असतो म्हणून आपण सर्वत्र मकरसंक्रांतीचा हा सण साजरा करत असतो. यावेळी सूर्य उत्तरेकडे सरकत असल्याने सूर्याला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव संपूर्ण भारतात साजरा केला जातो.

ह्या सामाजिक आणि भौगोलिक सणाला आजकाल रंगीबेरंगी सजावटीचे पतंग उडवण्याची प्रथा आणि हुरड्याची मेजवानी देखील प्रचलित होत आहे.

संक्रांतीचा आदला दिवस हा महाराष्ट्रात भोगी या नावाने साजरा केला जातो. हवामानामुळे शेतशिवारात उपलब्ध सर्व शेंगाभाज्या, फळभाज्या यांची तिळाचा कूट घालून केलेली मिश्र भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी अणि मुंगाची खिचडी असे पदार्थ या दिवशी आवर्जून केले जातात. संक्रांतीच्या दिवशी गुळाची पोळी किंवा तिळगुळाची पोळी या खाद्य पदार्थाला विशेष महत्त्व असते.

मकर संक्रांतीचा उत्सव केवळ दानधर्मासाठीच नाही तर या दिवशी दरवर्षी पतंग उडवण्याची परंपरा देखील आहे. पतंग उडवणे हा या उत्सवातील विधी आहे. प्रत्येकजण मुले किंवा तरूण पतंग उडवण्यासाठी या दिवसाची आतुरतेने

**रूचिरा बेटकर**
नांदेड. ९९७०७७४२११

वाट पाहतात. सकाळपासूनच आकाशात सर्वत्र रंगीबेरंगी पतंग दिसतात. भारतात पतंग कधी आला हे निश्चित सांगणे कठीण आहे पण देशभरातील पूर्वीच्या अनेक संतकवींच्या रचनांमध्ये पतंगाचे वर्णन आणि उल्लेख आढळतात. पतंगाचे उंच आकाशात विहरणे आणि तरीही जमिनीशी धाग्याने बांधलेले असणे, कापला गेल्यास अकाशातच गटांगळ्या खात भरकटत जाणे या गोष्टी साहित्य क्षेत्राला खूपच भावल्या ! त्यामुळे अगदी आजसुद्धा भारतीय भाषांमधील वाययात, चित्रपटात, कविता, गीते यामध्ये पतंगाची उपमा फार लोकप्रिय आहे.

मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची प्रथा केवळ धार्मिकच नाही तर त्यामागे वैज्ञानिक कारण देखील आहे. भारतामध्ये महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, बिहार,पंजाब या राज्यांमध्ये पतंगबाजी खूप प्रसिद्ध आहे. पतंग महोत्सव अनेक ठिकाणी आयोजित केला जातो. या मध्ये आकाशात वेगवेगळ्या आकाराचे पतंग दिसतील, ते दृश्य मंत्रमुग्ध करणारे असते. पतंग उडवल्यामुळे मनाला नक्कीच आनंद मिळतो, परंतु काही गोष्टींची काळजी घ्यावी लागते. कारण आनंदाचे दुःखामध्ये रूपांतर होण्यास अजिबात वेळ लागत नाही. पतंग उडवण्यासाठी सुरक्षित जागा निवडा आणि चीनी मांजाचा वापर करू नका. मांजाची धार धारदार करण्यासाठी बल्बचा भूसा इत्यादींचा वापर केला जातो.

पतंग उडवताना खुप अपघात होतात. त्यामुळे स्वतःची आणि इतरांची काळजी घेत हा सण साजरा करावा. बेजबाबदार पणामुळे किंवा अनभिज्ञपणे घडणारा एक जीवघेणा अपघात यामुळे मांजा न वापरता टळू शकतो. जिथे अशा अपघाताची शक्यता आहे अशा ठिकाणी हा उपाय करायला हरकत नाही.

पर्यावरणपूरक,पर्यावरणाचं संतुलन राखून हा सण साजरा करूया आणि तिळगुळाचा गोडवा चाखूया!

# परिसस्वरूपी व्यक्तिमत्त्वाच्या सहवासाने घडलेले प्रा.महेशराव

### जवाहरलाल नेहरू शिक्षण संस्था बरबडा आयोजित सहावे राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य अध्यक्षपदी साहित्यिक प्रा. महेश मोरे सर यांची निवड झाल्याबाबत अभिनंदनिय शब्दपुष्पमाला..



लोह परिसराच्या सहवासात यावे आणि त्याचे सोने होऊन जावे. चंदनाच्या ज्ञानसुगंधी सहवासाने जीवन चैतन्यदायी व्हावे, भूतकाळात केलेल्या अविरत कष्टाने अंगणात सुगंधी फुलांची ज्ञानबाग फुलावी, सातत्याने इतरांच्या जीवनातील काटे वेचत गेल्याने ज्यांचा जीवनपथ प्रशस्त व्हावा, मनाच्या अंतरंगात सुखाचे चांदणे पसरावे आनंदाचा वात्सल्याचा पाऊस पडावा हा योग ज्यांच्या जीवनात आला ते व्यक्तिमत्व म्हणजे आमचे परम आदरणीय मित्र, सुप्रसिद्ध मराठी ग्रामीण साहित्यिक प्रा. महेश मोरे सर. काही माणसे नम्रतेने, विद्वत्तेने, रोपकारितेने, सज्जनांच्या सहवासाने प्रचंड मोठी यशस्विता प्राप्त करू शकतात याचे सुंदर उदाहरण म्हणजेच मराठवाडा साहित्य परिषद नांदेड शाखेचे कार्यवाह प्रा. महेश मोरे. हिंगोली जिल्ह्यातील घोडा कामठा येथील एका सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या ग्रामीण साहित्यिक प्रा. महेश मोरे यांनी मराठी ग्रामीण साहित्याला समर्पित होऊन खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण साहित्याची महान परंपरा समृद्ध केली. जो कोणी व्यक्ती या माय माऊलीची प्रामाणिकपणे सेवा करतो ती माय माऊली, जन्मभूमी आपणास उदंड देते असेच काहीसे प्रा. महेश मोरे यांच्या बाबतीत घडले. दिवंगत माजी आमदार, खासदार कष्टकरी बारा बलुतेदारांचे कैवारी, अनाथांचे नाथ श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक भाई डॉ.केशवरावजी धोंडगे साहेब आणि सन्माननीय श्री. मा. आमदार भाई गुरुनाथरावजी कुरुडे साहेब यांच्या मंगल आशीर्वादाने श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाची संधी मिळते . अंगी अत्यंत नम्रता असणारा हा व्यक्ती आपल्या सुंदर स्वभावाने नांदेडच्या साहित्यसृष्टीतील ज्येष्ठ साहित्यिक ग.पी. मनुरकर देविदास फुलारी, कथाकार दिगंबर कदम, यांच्यासारख्या परिसरुपी व्यक्तिमत्त्वांच्या सहवासात रमतो आणि लिहीत जातो ग्रामीण जीवनाच्या सुखदुःखाची कडू गोड कहाणी. कर्मण्येवाधिकारस्तेमा फलेशू कदाचन या तत्त्वाप्रमाणे आपले अध्यापन कार्य आणि लेखन कार्य मागील दोन दशकापासून सातत्याने चालत राहते. आपण प्रामाणिकपणे काम करावे कुठला पुरस्कार, कुठल्या संमेलनाच्या अध्यक्षपद प्राप्त करण्यासाठी मुळीच लिहू नये हा थोरामोठ्यांचा विचार मनी बांधला आणि लिहीत गेले कष्टकरी माय बापाच्या जीवनाची गोड गाणी. प्रयत्नांती परमेश्वर, पेरले ते उगवते या पद्धतीने मागील दोन वर्षापासून झपाट्याने लेखनाचा आवाका विस्तारला आणि जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद२०२४ मध्ये प्राप्त झाले. त्यानंतर २०२५ मध्ये ज्यांच्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने घडले ते, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ पुण्याचे सदस्य, आमचे मार्गदर्शक ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी सर आणि साहित्यिक दिगंबर कदम यांनी लोकसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ प्रा. महेश मोरे यांच्या गळ्यात टाकली . हजारो रसिकांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या या समारंभातील अध्यक्षपदाची धुरा उतरते न उतरते तोच बरबडा जवाहरलाल नेहरू शिक्षण संस्थेच्या जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बरबडा आयोजित सहाव्या राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडते हा क्षण म्हणजे आनंदाचे डोही आनंद तरंगे असाच अशा या ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न, नम्र ,कार्यतत्पर सर्वांशी आपुलकीने वागणाऱ्या आमच्या मार्गदर्शकाचे मनस्वी अभिनंदन...!!!


साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा. लेखक किंवा कवी जीवन जगताना ज्या अनेक गोष्टींचा अनुभव घेतो, तेच त्यांचे अनुभव लेखनाच्या रूपाने व्यक्त होत असतात. मागील अडीच दशकाहून अधिक काळ अध्यापनाचे कार्य करणारा एक तळमळीचा प्राध्यापक आपल्या व्यासंगातून आणि प्रज्ञासंपन्न व्यक्तिमत्त्वाच्या सहवासातून लेखक रूपाने मराठवाड्याच्या भूमीत उदयास आला. हिंगोली जिल्ह्याच्या घोडा कामठ्याच्या पवित्र पावन भूमीतून आलेल्या प्रा.महेश मोरे नावाच्या या व्यक्तिमत्वाने शिवार या काव्यसंग्रहापासून साहित्य प्रांतात प्रवेश केला. नंतरच्या काळात हिरवेरान, पाऊस काळ, काव्यरूप शेतकऱ्याचा आसूड हे काव्यग्रंथ आले. मराठी साहित्याचे सातत्याने अध्ययन -अध्यापन होत गेले आणि त्यातूनच कथेचे पुढचे पाऊल म्हणजे कादंबरी हे प्रा. महेश मोरे यांच्या लेखनाचे क्षेत्र बनले. गावपांढरी, बोऱ्याची गाठ या नामवंत कादंबऱ्या लेखकाने आपल्या लेखणीतून साकारल्या. साहित्याच्या प्रांतात घोडदोड चालू असताना बालकांच्या, किशोरवयीन मुलांच्या मनावर उत्तम संस्कार घडावेत म्हणून त्यांनी गुराखी गड बालकविता संग्रह साकारला. त्यानंतर स्वातंत्र्य सेनानी दिपाजी पाटील, शहीद संभाजी कदम यासारखे संस्कारक्षम चरित्र लेखनही झाले. लेखकांच्या चरित्र लेखनातील सामाजिक बांधिलकीची भावना जणू मुलांच्या हृदयाला साद घालते.

परमपूज्य साने गुरुजी नेहमी म्हणायचे करी मनोरंजन प्रबोधन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचेत्याच

**प्रा.धाराशिव वैजनाथराव शिराळे**
हिंगोली. ९८२३२८२०५९

पद्धतीने प्रा. महेश मोरे यांचा हा ज्ञानयज्ञ चालू आहे. त्यांच्या या उत्तुंग भरारीत त्यांच्या अर्धांगिनी अध्यापिका सौ.पुष्पाताई यांचे योगदान शहाजीराजांच्या जिजाऊसारखे, भारतरत्न डॉ.भीमरावाच्या रमाई सारखे आहे. सज्जनंच्या संस्कारातून,प्रभावातून महेश मोरे नावाचे व्यक्तिमत्व घडले. म्हणतात ना लोखंड परिसाच्या सहवासात आले की, त्यांचे सोने होते त्या पद्धतीने प्रा.महेश मोरे सरांची ही साहित्य क्षेत्रातील घोडदौड निश्चितच इवलेसे रोप लावियेले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी याप्रमाणे आहे. अशा या ज्ञानप्रवासातील ज्ञानाचातकाचे मनस्वी अभिनंदन आणि खूप साऱ्या शुभेच्छा.

# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी



शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.



अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले.

१७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी

**अलका पाटील**
उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड

समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

## नांदेड- बंगलोर एक्स्प्रेस काही दिवस नांदेड- यशवंतपूर- नांदेड दरम्यान धावणार

नांदेड (प्रतिनिधी)- बेंगलोर स्थानकातील पीट लाईन क्रमांक ३ ची कॅमटेक डिझाईननुसार व्हॅटवॉकसह पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. त्यामुळे दि. १६ जानेवारी ते १० मार्चपर्यंत ५४ दिवसांसाठी पीट लाईन क्रमांक ३ आणि स्टेबलिंग लाईन क्रमांक ५ च्या वापरावर निर्बंध घालण्यात आला आहे.

या निर्बंधामुळे हजूर साहिब नांदेड बंगलोर- हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस वरील कालावधीत नांदेड- यशवंतपूर- नांदेड अशी धावणार असल्याचे दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने कळविले आहे.

गाडी क्रमांक १६५९४ हजूर साहिब नांदेड बेंगलोर एक्स्प्रेस दिनांक १६ जानेवारी ते १० मार्चपर्यंत ५४ दिवसांसाठी हजूर साहित्र नांदेड- यशवंतपूर अशी धावेल, ही गाडी यशवंतपूर येथे सकाळी ४.१५ वाजता पोहोचेल. या कालावधीत बेंगलोर केंट आणि बेंगलोर येथील थांबे वगळण्यात आले आहे. १६५९३ गाडी क्रमाक बेंगलोर हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेस दिनांक १७ जानेवारी ते ११ मार्चपर्यंत ५४ दिवसांसाठी यशवंतपूर येवून रात्री २३.५५ वाजता सुटेल आणि यशवंतपूर-हजूर साहिब नांदेड अशी धावेल. या कालावधीत बेंगलोर आणि बेंगलोर केंट येथील थांबे वगळण्यात आले आहेत.

# विकासाचा पिक्चर बघण्यासाठी मनपाची सत्ता द्या

## आ.बालाजीराव कल्याणकर यांची मतदारांना साद

नांदेड : नांदेड उत्तर भागात झालेली आतापर्यंतची विकास कामे केवळ विकास कामाचे छोटे ट्रेलर आहे . विकास कामाचा खरा पिक्चर बघण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ. बालाजीराव कल्याणकर यांनी केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक नऊ मध्ये शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी आ.बालाजीराव कल्याणकर यांच्या नेतृत्वात आज काढण्यात आलेल्या भव्य रॅलीने या भागातील वातावरण अक्षरशः भगवे झाले आहे. हजारो मतदार, नागरिक आणि शिवसैनिक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. तुम्ही फक्त शिवसेनेचे नगरसेवक विजयी करा नांदेड उत्तर भागातील सर्वच प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी माझी राहील असा विश्वास आ. कल्याणकर यांनी यावेळी मतदारांना दिला आहे.

प्रभाग क्रमांक नऊ मधील शिवसेनेचे उमेदवार गायकवाड काशीबाई तुळशीराम, मादनवाड संतोष सायना, भालेराव नंदाबाई



नवनाथराव आणि भोसले विलास यांच्या प्रचारासाठी आ. बालाजीराव कल्याणकर यांनी श्रीनगर सह या प्रभागातील सर्वच वार्डातून काढलेल्या रॅलीमुळे वातावरण शिवसेनामय झाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड उत्तर भागात करण्यात आलेली विकास कामे ही केवळ अडीच वर्षातील विकास कामांचे ट्रेलर आहे. आगामी काळात विकासाचा खरा पिक्चर तुम्हाला बघायला मिळेल. त्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन आ. बालाजीराव कल्याणकर यांनी यावेळी केले . शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांच्यासह शिवसेनेतील अनेक पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मतदारांचा आशीर्वाद घेतले. नांदेड महानगरपालिकेत गेले तीस वर्षाहून अधिक काळ ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी आता जनतेला वाऱ्यावर सोडले आहेत. नांदेडला चार वेळा मुख्यमंत्रीपदी मिळाले परंतु नांदेडचा विकास होऊ शकला नाही. मुख्यमंत्री म्हणून भाई एकनाथराव शिंदे आणि नांदेडच्या विकासासाठी दिलेला निधी ऐतिहासिक ठरला आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या कामाचा आणि दिलेल्या निधीचा लेखाजोखा जनतेसमोर प्रभागा प्रभागात फ्लेक्स लावून दिला आहे . आपण ते फ्लेक्स बघावेत आणि विकास कामे झाल्याचेही ताडून बघावे मागच शिवसेनेला मत द्यावा असे आवाहन आ. कल्याणकर यांनी केले आहे. आम्ही बोलत नाही परंतु जनतेची कामे करून दाखवतो . जे बोलतात ते मते मागतात आणि गायब होतात. अशा गायब होणाऱ्या लोकांना आता मतपेटीतून गायब करा असे आवाहनही आ. कल्याणकर यांनी केले आहे.

दरम्यान आ.बालाजीराव कल्याणकर यांनी आज सकाळी प्रभाग क्रमांक एक, दोन, तीन, चार, पाच आणि ९ मध्ये ही झंझावती दौरा केला. जनतेचा विश्वास हा शिवसेनेवर आहे विकास कामांवर आहे. त्यामुळे निश्चितपणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

### पन्नास वर्षात विकास झाला नाही तो अडीच वर्षात करून दाखवला

नांदेड उत्तर भागात गेल्या अडीच तीन वर्षात झालेल्या विकास कामाचा हिशोब आणि लेखाजोखा नांदेड शहरातील विविध भागात फ्लेक्स लावून शिवसेनेने दिला आहे. केलेल्या विकास कामांची नावे, निधीची रक्कम असा उल्लेख त्यावर करण्यात आला आहे. इतका पारदर्शी कारभार शिवसेनेचा आहे . त्यामुळे ज्यांनी विकास कामाच्या नावावर जनतेची दिशाभूल केली. शिवसेनेने केलेली कामे आपण केल्याचे भासवत जनतेच्या डोळ्यात धुळफेक केली आणि जे केवळ आश्वासन देत आहेत. आशा भामट्या नेत्यांपासून सावध रहा असे आवाहनही. आ. बालाजीराव कल्याणकर यांनी केले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांची अवैध उत्खननावर धडक कारवाई

# ३ कोटी ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त



नांदेड (प्रतिनिधी) : लोहा तालुक्यातील मौजे येळी येथील नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी धडक कारवाई करत ३ कोटी ३२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रविवार ११ जानेवारी रोजी लोहा तालुक्यातील मौजे येळी येथे नदीपात्रातून अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याची गोपनीय माहिती जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी रात्री सुमारे १०.३० वाजता प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या वेळी नदीपात्रात अवैध उत्खनन सुरू असताना ३ हायवा ट्रक, ७ जेसीबी, १ मोठी फायबर बोट व ४ तराफे आढळून आले. तत्काळ स्थानिक पोलीस प्रशासन व तहसीलदार यांना घटनास्थळी बोलावून अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे सर्व साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईत ४५ ब्रास वाळूचा साठा देखील जप्त करण्यात आला असून, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ३ कोटी ३२ लाख रुपये इतकी आहे.

जप्त केलेला सर्व मुद्देमाल तहसील कार्यालय, लोहा येथे जमा करण्याचे निर्देश देण्यात आले असून, त्यावर दंडात्मक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या कारवाईमुळे नांदेड जिल्ह्यातील अवैध उत्खनन व अवैध वाहतुकीवर निश्चितच आळा बसण्यास मदत होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली आहे.

## तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ जारी

नांदेड (प्रतिनिधी ) : केंद्र शासनाचा ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ व त्याअंतर्गत नियम २०२० संपूर्ण देशात लागू करण्यात आले आहेत. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी केंद्र शासनामार्फत स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

या पोर्टलच्या माध्यमातून तृतीयपंथीयांसाठी नॅशनल हेल्पलाईन क्रमांक १४४२७ उपलब्ध करून देण्यात आला आहे. या हेल्पलाईनद्वारे तृतीयपंथीय व्यक्तींना त्यांच्या हक्कांबाबत माहिती, मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे. नांदेड जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी या नॅशनल हेल्पलाईन क्रमांकाचा व्यापक प्रचार व प्रसिध्दी करण्यात येत आहे, अशी माहिती समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# नांदेडच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपला मत द्या



खा.डॉ.अजित गोपछडे यांचे आवाहन

नांदेड ( प्रतिनिधी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली खऱ्या अर्थाने देशात विकास सुरू झाला आहे तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शाश्वत विकास आला जनतेपर्यंत पोहोचवले आहे. नांदेड शहर व जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री, खासदार अशोकराव चव्हाण यांच्यामुळे विकासाची असंख्य कामे झाली आहेत. विकसित भारत, विकसित महाराष्ट्र यामध्ये विकसित नांदेड घडवण्यासाठी खा.अशोकराव चव्हाण यांचे हात बळकट करण्यासाठी महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचे उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा. नांदेडला एज्युकेशन , मेडिकल आणि ए आय चे हब करण्यासाठी भाजपला विजयी करा असे आवाहन खा.डॉ. अजित गोपछडे यांनी केले.

प्रभाग क्रमांक १५ मधील भाजपाचे उमेदवार बालाजी सटवाजी आलमखाने ,सौ .कोमल धनंजय भाडेवाड ,आकाश बालाजीराव टाक यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.यावेळी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण, महानगराध्यक्ष माजी आमदार ,अमरनाथ राजूरकर, महेश बाळू खोमने, लक्ष्मीकांत गोणे, बालाजी गिरगावकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की , विरोधकांमध्ये समन्वय नाही ते एकमेकांविरुद्ध दंड थोपटून आहेत . त्यामुळे विरोधक नांदेड महानगरपालिकेचा कारभार चालवूच शकत नाहीत. गुरु-ता - गद्दीच्या काळात नांदेड शहराचा जो विकास झाला होता त्याच धर्तीवर खा. अशोकराव चव्हाण साहेबांच्या नेतृत्वात पुन्हा नांदेडला नव्या रूपाने उभे करायचे आहे. वंदे भारत , विमानसेवा आणि रेल्वेमुळे नांदेडची कनेक्टिव्हिटी देशातील विविध राज्यांशी वाढलेली आहे. त्यामुळे भविष्यात मोठे रोजगार येथे स्थापन करण्याचा आमचा संकल्प आहे. आपल्या पाठबळावर नांदेड महापिकेलावर भाजपची सत्ता स्थापन होईल . भाजपाचा नवा महापौर आपल्या भागात मूलभूत सुविधा महानगरपालिका उपलब्ध करून देईलच परंतु आम्ही दोघे मिळून नांदेडला अत्याधुनिक शहर करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. मेडिकल हब, एज्युकेशन हब आणि ए आय हे अत्याधुनिक हब म्हणून नांदेडची नवी ओळख निर्माण करण्याचा आमचा संकल्प आहे .कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता खासदार अशोकराव चव्हाण यांचे हात अधिक बळकट करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नव्या वर्षाची गिफ्ट म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीची स्थापना स्थापन करा. यासाठी कमळ या निशाणी समोर बटन दाबून भाजपाचे प्रत्येक उमेदवाराला विजयी करा.

### महाराष्ट्र राज्य आरोग्य प्रशासकीय कर्मचारी संघटनेची बैठक संपन्न

# जिल्हाध्यक्षपदी विजय चव्हाण यांची निवड

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड जिल्हा आरोग्य विभागातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांची बैठक राज्याध्यक्ष विजय बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीला लातूर विभागीय अध्यक्ष प्रकाश सानप, सचिव अभिमन्यू सुर्वसे व इतर मान्यवर हजर होते. या बैठकीत संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी विजय चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

संघटनेच्या बैठकीत अत्यंत साधेपणात पार पडलेली असून जिल्हातून सर्वच कर्मचाऱ्यांनी अतिशय चांगला प्रतिसाद दिल्याचे या बैठकी मध्ये दिसून आले. आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजातील समस्या, विविध प्रश्न व अडी अडचणीबाबत आपले विचार मांडले. गेल्या दोन वर्षापासून रखडलेल्या पदोन्नती व त्यातील टप्पे कमी करणे, आश्वासित प्रगती योजना व इतर काही प्रश्नावर सर्वांचे विचार



मंथन झाले. यामध्ये श्रीमती राठोड, भंगारे, दरगू, पानपट्टे, मलदोडे यांनी आपले विचार मांडले. संघटनेचे विभागीय अध्यक्ष सानप यांनी सर्वांसोबत सुसंवाद साधून संघटनेने राज्यपातळीवर प्रशासनातील प्रश्नावर विविध कामे केलेली असल्याचे सांगून कुठली ही प्रसिद्धी न करता आपल्या सर्व कर्मचारी बंधू साठी काम केल्याचे, प्रश्न वरिष्ठ पातळीवर मांडल्याचे सांगीतले.

या बैठकीमध्ये सर्व सर्वानुमते नवीन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात येऊन त्यामध्ये जिल्हाध्यक्ष -विजय चव्हाण, उपाध्यक्ष - संतोष दरगू, सचिव-सचिन पानपट्टे ,कोषाध्यक्ष: अविनाश मलदोडे, संघटक: शाम सावंत, महिला संघटक : मिनू राठोड यांची निवड करण्यात आली. योगेश मुदीराज यांनी कार्यकारिणी प्रस्ताव सादर केल्यानंतर सर्वानुमते सर्व पदाधिकारी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या बैठकीमध्ये मुंबई येथून संघटनेचे राज्याध्यक्ष विजय बोरसे यांनी व्हिडीओ कॉलद्वारे सुसंवाद साधला.

नांदेडचे संघटन योगेश मुदिराज यांच्या नेतृत्वाखाली अतिशय चांगले वैचारिक व मजबूत, प्रेमळपणे असल्याचे गौरवोद्गार काढले. पंडित सिनकर यांनी आभार व्यक्त केले. यावेळी जैरमोड,कल्याणकर, जाडे, श्रीमती भंगाळे, श्रीमती धिरडीकर, मामीलवाड, गोपिनवार, हरनाळीकर, पिंपळे, घोडगे, मगर, तांबोळी, राठोड, दुधेवाड, धुरपडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रीय युवा दिन उत्साहात

नांदेड : श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे आज स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा व मूल्यांचा प्रसार करणे, तरुणांना देशाच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्यासाठी प्रेरित करणे तसेच त्यांच्यामध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे हा या दिनाच्या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद यांचे जीवनकार्य, त्यांचे प्रेरणादायी विचार यावर प्रकाश टाकण्यासाठी मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय कीर्तनकार श्री. जी. बी. गिरोड यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून अत्यंत विनोदी, मार्मिक आणि प्रभावी शब्दांत प्रशिक्षणार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. समाजप्रबोधनपर विचार मांडताना त्यांनी अंधश्रद्धा, व्यसनाधीनता व अपप्रवृत्तींपासून दूर राहण्याचे आवाहन केले.



# आठव्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा.महेश मोरे

नांदेड ( प्रतिनिधी) : मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेडचे कार्यवाह, ललित कला प्रतिष्ठान नांदेडचे सहकार्यवाह, मायबोलीत कविता लिहिणारा सर्जनशील कवी, ग्रामजीवनातील शेतशिवार व गावगाड्याचे प्रत्ययकारी चित्रण करणारा कादंबरीकार, चरित्र लेखक आणि साहित्यिक कार्यकर्ता प्रा.महेश मोरे यांची स्वातंत्र्यसेनानी गोविंदराव धर्माधिकारी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ होणाऱ्या आठव्या राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे.

या संमेलनाचे संयोजक तथा प्राचार्य सुदर्शन माधवराव धर्माधिकारी यांनी आज संस्थेच्या वतीने पत्र देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला. हे संमेलन सोमवारी दि. १९ जानेवारी २०२६ रोजी बरबडा येथे संपन्न होणार आहे.

यावेळी माजी प्राचार्य वसंत शिंदे, प्रा. व्यंकटेश सोळंके, प्रा. बालाजी बोकारे, प्रा. महेश नलबलवार, सौ. पुष्पा मोरे, कु. ऋतुजा मोरे, चि.आशुतोष मोरे उपस्थित होते.

# भाजपाच्या संकल्पनाम्यावर डॉ.यशपाल भिंगे यांची टीका

नांदेड (प्रतिनिधी) - महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने भाजपाच्या वतीने संकल्पनामा प्रकाशित करण्यात आला. यात नांदेड शहरातील काही विकासाच्या कामाचे छायाचित्रे भाजपाच्या कमळासह प्रकाशित करण्यात आली. मात्र नांदेड महानगरपालिका स्थापनेपासून आजलगत भाजपाची नांदेड महानगरपालिकेवर कधीच सत्ता नव्हती तेव्हा त्या विकासकामावर दावा करून पुस्तीका प्रकाशित करणे हस्यास्पद आहे. अशी टीका ओबीसी काँग्रेस विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा महानगरपालिका निवडणूक प्रवक्ते डॉ.यशपाल भिंगे यांनी केली.

महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने काँग्रेस कार्यालय येथे सोमवार (ता.१२) रोजी पत्रकार परिषद आयोजीत करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. यावेळी काँग्रेस जिल्हाप्रवक्ता बापूसाहेब पाटील, आभ्यासक अल्ताफ सानी यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. यशपाल भिंगे म्हणाले की, काँग्रेस व वंचित आघाडीला जनतेतून प्रंचड प्रतिसाद मिळत



आहे. ६१ हुन अधिक जागा आम्ही जिंकू असे वातावरण आहे.पक्षविरोधी भूमिका घेऊन अपक्ष उमेदवार म्हणून निवडून रिंगणात उतरलेले पदाधिकारी मून्तजीब, सुभाष रायबोळे, मनिष कांबळे यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. अशी माहिती देखील त्यांनी दिली. मुस्लिम वस्ती भागातील प्रभागात एमआयएम व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाला जनतेचा प्रतिसाद मिळणार नाही याठिकाणी सुद्धा काँग्रेस वंचित आघाडी विजयी होईल अशा विश्वास महानगरपालिका निवडणूक प्रवक्ते अभ्यासक अल्ताफ सानी यांनी सांगितले. पत्रकार परिषदेची प्रस्तावना जिल्हाप्रवक्ता बापूसाहेब पाटील यांनी केले.

# नेतृत्वहीन काँग्रेस नांदेडचा विकास कसा करणार

### खा.अशोकराव चव्हाण यांचा सवाल : प्रभाग १३ आणि १५ मध्ये भाजपचा झंजावती प्रचार

नांदेड : काँग्रेस संपण्याची गिनती सुरू झाली आहे. काँग्रेसमध्ये नेता उरलेला नाही. तुम्ही काय विकास करणार, तुम्ही तुमच्याच जागेवर बरोबर नाही, अशी परिस्थिती आहे.विरोधकांकडे विकासाचा अजेंडा नसून केवळ माझ्यावर टिका करतात. काँग्रेस नेतृत्वहीन झाली आहे त्यामुळे ती नांदेडचा विकास करूच शकत नाही. त्यामुळे ते कुणाच्या बळावर नांदेडचा विकास करतील असा सवाल खा. अशोकराव चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. त्यासाठी विकासासाठी वभाजपला विजयी करा असे आवाहन खा. अशोकराव चव्हाण यांनी केले आहे. प्रभाग १३ आणि १५ मधील भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते.

माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, चैतन्यबापू देशमुख, बाळू खोमणे,



बाळासाहेब कांबळे , कौशल्याबाई गायकवाड, सरस्वतीबाई पंडित, विकीभाऊ शेवडीकर, सुनिता कांबळे, बालेभाऊ कांबळे, नितीन चौदंते, कुणाल कांबळे, संतोष मोतीपवळे, राजू पंडित, कमलाकर मल्हारे. यांच्यासह प्रभाग क्रमांक १३, सिद्धार्थनगरचे भाजपा उमेदवार अंचन जोंधळे, शांताबाई कोमटवार, नागेश कोकुलवार, भालचंद्र पत्की यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की ,पंतप्रधान नरेंद्र मोदी हे संसदेत प्रथम प्रवेश करताना संविधानासमोर नतमस्तक झाले. मात्र काँग्रेसने संविधान बदलण्याचा अपप्रचार केला होता. त्यांना धडा शिकवण्याची वेळ आली आहे.कमळ निशाणीवर बटन दाबून भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला मान देऊनच भाजप सरकार काम करत आहे. सिद्धार्थनगर भागात मी पहिल्यांच आलो असून या भागातील प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावणार आहे. सिद्धार्थनगर चौफाळा भाग हा भाजपला जीवंत ठेवणारा गड आहे. बारा बलुतेदार हे गेल्या अनेक पिढ्यांपासून आपले पारंपरिक व्यवसाय चांगल्या प्रकारे चालवत असून त्यांचे बचत गट निर्माण होत आहेत. येणाऱ्या काळात लखपती दीदी बनविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून भाजप सरकार अधिकची रक्कम देणार आहे. यावेळी चैतन्यबापू देशमुख, बाळू खोमणे, बाळासाहेब कांबळे यांनीही आपले विचार मांडले.

# राष्ट्रवादीला मत म्हणजे विकासाला आणि विश्वासाला मत

## आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे घड्याळाला मतदान करण्याचे आवाहन

नांदेड : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेले मत म्हणजे विकासाला आणि आपल्या विश्वासाला दिलेले मत आहे . त्यामुळे नांदेड महापालिकेच्या सर्वांगीण विकासासाठी घड्याळासमोरील बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले आहे.

प्रभाग क्रमांक सहा मधील प्रवेशिका क्षितीज जाधव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी त्यांनी बैठक घेतली यावेळी ते बोलत होते. व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे , माजी आमदार अविनाश घाटे, माधव पावडे, शिवराज पाटील होटाळकर यांच्यासह अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ.प्रतापराव पाटील चिखलीकर म्हणाले की, नांदेड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण ज्यांच्यावर गेल्या ५० वर्षापासून विश्वास दाखवला आहे. त्या लोकांनी नांदेड शहराचा विकास केला नाही. उलट जनतेच्या विकासाचा विश्वासघात केला




आहे. जनतेला केवळ आश्वासन देणे, सत्ता लाटणे आणि जनतेला वाऱ्यावर सोडून देणे हे तथाकथित नेत्याचे अंगभूत गुण आहेत. म्हणूनच नांदेडची दिल्लीमध्ये बदनामी झाली. या आदर्श नेत्याचा आता सुफडा साफ करण्याची वेळ आली आहे. होऊ घातलेल्या महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला स्वतःचे उमेदवारी मिळाली नाहीत म्हणून त्यांना नाईलाजाने काँग्रेस मधून सर्व उमेदवार आयात करावे लागले . आयात केलेल्या उमेदवारांच्या हाती सत्ता दिल्यास भारतीय जनता पार्टीचे विचारधारा संपुष्टात येईल. त्यामुळे भारतीय जनता पार्टीची मूळ विचारधारा जिवंत ठेवण्यासाठी हिंदू बांधवांनी आता जागृत होण्याची गरज असल्याची त्यांनी म्हणाली.

प्रभाग क्रमांक सहा मध्ये किशोर भवरे हे कधी आले नाहीत. त्यांनी कधीही कोणाची कामे केले नाहीत. कुणाच्या सुख दुखायला आले नाहीत. त्यामुळे अशा आयात केलेल्या नेत्याला आपल्या प्रभागातून हाकलून लावा आणि आपल्या सेवेसाठी काम करणाऱ्या क्षितिज जाधव यांच्या पत्नी आमच्या भगिनी प्रवेशिका क्षितीज जाधव आणि एडवोकेट नेजा यांच्या घड्याळ या निशाणी समोर बटन दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा. सोबतच नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येक उमेदवाराला प्रचंड मतांनी विजयी करा. शहराचा विकास करून दाखवण्यात जबाबदारी माझी राहील असा विश्वास आहे त्यांनी दिला.

# अपक्ष उमेदवार मीनल पाटील यांना पाठिंबा नाहीच



**उद्योगमंत्री उदय सामंत आणि शिवसेनेचे नेते आनंद जाधव यांचा जाहीर खुलासा**

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक तीन मधील क च्या अपक्ष उमेदवार मीनल गजानन पाटील यांनी मला शिवसेनेचा पाठिंबा नसल्याचे जाहीर करून शिवसेनेच्या नेत्यांचे फोटो वापरून मते मागवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र शिवसेनेचा त्यांना कोणताही पाठिंबा नाही. शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धनुष्यबाण या निवडणूक निशाणीवर जे उमेदवार उभे केले आहेत तेच उमेदवार शिवसेनेचे आहेत. त्यामुळे कोणीही अशा मीनल पाटील या अपक्ष उमेदवाराच्या पाठीशी शिवसैनिकांनी, मतदारांनी उभे राहू नये असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, शिवसेना परभणीचे संपर्कप्रमुख तथा शिवसेनेचे नेते आनंद जाधव यांनी केले आहे. काल नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दोन जाहीर सभांमधून त्यांनी हा मोठा खुलासा केला असल्याने आता मीनल पाटील यांचा खोटा चेहरा जनतेसमोर आला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक तीनकडे संपूर्ण नांदेडचे लक्ष लागले आहे. या प्रभागात शिवसेनेचे चार उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. यामध्ये शिवसेना शहर प्रमुख युवा नेतृत्व श्याम पाटील कोकाटे यांच्या मातोश्री करुणा कोकाटे या माजी नगरसेविका असून त्या सर्वसाधारण महिला प्रवर्गातून निवडणुकीला सामोरे जात आहेत. शिवसेनेने त्यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. त्यांची निवडणूक निशाणी धनुष्यबाण आहे. असे असतानाही नुकतेच नांदेडच्या राजकारणात पाय ठेवलेल्या गजानन पाटील यांनी आपल्याला शिवसेनेची उमेदवारी स्थानिक आमदाराने जाणीवपूर्वक नाकारली असा खोटा आरोप करत त्यांची पत्नी मीनल पाटील यांना अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. त्यानंतर शिवसेनेच्या काही नेत्यांना सोबत घेऊन कार्यालयाचे उद्घाटन केले. वास्तविक यानंतर शिवसेनेमध्ये थोडीशी अस्वस्थता निर्माण झाली होती. परंतु आ. बालाजीराव कल्याणकर यांनी खरी परिस्थिती शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. याच वेळी शिवसेनेतील अनेक मंत्री आणि वरिष्ठ नेत्यांच्याही लक्षात ही बाब आणून दिल्यानंतर मीनल पाटील या शिवसेनेच्या किंवा शिवसेना पुरस्कृत उमेदवार नाहीत हे जाहीर करण्यात आले आहे. यासाठी काल राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी नांदेडमध्ये झालेल्या कॅनॉल रोडवरील जाहीर सभेत बोलताना सांगितले की, शिवसेनेने मीनल पाटील यांना शिवसेनेने कोणताही पाठिंबा दिलेला नाही. त्यांनी आमच्या नेत्यांचा फोटो वापरला असला तरीही ते आमच्या उमेदवार नाहीत. प्रभाग क्रमांक तीन मधील करुणा कोकाटे याच शिवसेनेच्या उमेदवार आहेत. त्यामुळे मतदारांनी आणि शिवसैनिकांनी कोणताही संभ्रम न ठेवता शिवसेनेच्या उमेदवारांना विजयी करावे. असे आवाहन त्यांनी केले.

## नांदेड महापालिकेसाठी उद्या मतदान

**निवडणूक विभागासह पोलिस प्रशासनही सज्ज**

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उद्या दिनांक १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. मतदानासाठी निवडणूक विभागासह पोलिस प्रशासनानेही जय्यत तयारी केली आहे.


नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या ८१ जागांसाठी उद्या दिनांक १५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे . या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी , शिवसेना , राष्ट्रवादी हे महायुतीतील पक्ष एकमेकांच्या समोर आहेत.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस आणि वंचित आघाडी यांची काही जागांवर आघाडी आहे तर वंचित आघाडी आणि काँग्रेस सर्वच जागांवर एकत्र लढत आहे. एम आय एम पार्टी मुस्लिम बहुल भागातून आपले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहेत. अनेक प्रभागात अपक्ष उमेदवारही आपले नशीब आजमावत आहेत.

# सामान्यांच्या हितासाठी झगडणाऱ्या काँग्रेसच्या हाती मनपाची सत्ता द्या

**खा.प्रा.रवींद्र चव्हाण यांची नांदेडकरांना साद**

नांदेड (प्रतिनिधी ) : काँग्रेस पक्षाला भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास आहे? देशाच्या जडणघडणीचा इतिहास आहे. समृद्धीचा इतिहास आहे. गोरगरीब जनतेच्या हितासाठी झगडल्याचा इतिहास आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या हितासाठी सदैव झगडणाऱ्या काँग्रेसच्या हाती महानगरपालिकेची सत्ता द्या आणि पुन्हा एकदा नांदेडमध्ये इतिहास घडवा असे आवाहन खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांनी केले आहे . प्रभाग क्रमांक दोन मधील काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते.

पुढे बोलताना खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टी आणि विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. ज्या लोकांनी विकासाच्या नावावर निधी लाटला . तेच लोक भ्रष्टाचारातील पैशातून आता तुमची मते मिळवण्यासाठी येत आहेत. ही लढत धनशाही विरुद्ध जनशाहीचीही आहे. हुकूमशाही विरुद्ध लोकशाहीची ही निवडणूक आहे.



त्यामुळे या निवडणुकीत आपण काँग्रेस पक्षाच्या पाठीशी उभे राहावे. असे आवाहन करतानाच माजी केंद्रीय गृहमंत्री कै.डॉ.शंकरराव चव्हाण साहेबांपासून ते जे नुकतेच भाजपात गेले त्या माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्यापर्यंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणातून वाभाडे काढले आहेत. स्वर्गीय शंकरराव चव्हाण साहेबांना दिल्लीत हेडमास्तर म्हणून गौरवले जात असे. दुर्दैवाने नांदेडच्या अस्मितेचा अपमान होत असतानाही खा. अशोकराव चव्हाण खाली मान घालून शांत बसले होते. ही नांदेडकरांसाठी अत्यंत शरमेची बाब आहे. एखादा नेता सत्तेसाठी किती लाचार होऊ शकतो हेच खा.अशोकराव चव्हाण यांनी आपल्या वर्तनातून दाखवून दिले आहे. ज्यांना स्वतःच्या आई-वडिलांची किंमत नाही ती तुमच्या सारख्यांची काय किंमत करतील असा प्रहारही खा.प्रा.रवींद्र चव्हाण यांनी घातला आहे.

नांदेडचा विकास हा केवळ काँग्रेस पक्षामुळे झाला आहे. कुण्या एका व्यक्तीमुळे नाही हेही भारतीय जनता पार्टीच्या तथाकथित नेत्यांनी लक्षात घ्यावे. भारतीय जनता पार्टीचे आणि त्यांच्या नेत्याचे नांदेडच्या विकासात शून्य योगदान आहे. माजी खासदार स्व.डी.बी. पाटील ही नांदेडच्या लोकसभेचे खासदार होते. त्याच्यानंतर भारतीय जनता पार्टीचे खासदार म्हणून प्रतापराव पाटील चिखलीकर निवडून आले होते परंतु याही नेत्यांना नांदेडच्या विकासासाठी काहीही करता आले नाही. असेही ते म्हणाले.

# आंबेडकरी चळवळीतील मतदारांनी काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे

**अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांचे आत्मीय आवाहन**


नांदेड (प्रतिनिधी)- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या प्रचार सभेमुळे काँग्रेस आणि वंचितच्या पदाधिकाऱ्यांमध्ये, उमेदवारांमध्ये आणि मतदारांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले असून, त्यांना एक प्रकारचे बळ मिळाले आहे. आंबेडकरी चळवळीतील मतदारांनी अन्य कोणत्याही भूलथापांना बळी न पडता फुले ,शाहू, आंबेडकरी विचारधारा पुढे नेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील स्वराज्याची पुन्हा निर्मिती करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. आपले




प्रत्येक मत वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसच्या उमेदवारांना द्यावे असे आत्मीय आवाहन अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

प्रभाग क्र. १ मधील काँग्रेसच्या उमेदवार डॉ. चंद्रायणी यशवंतराव निखाते, लक्ष्मीबाई बालाजी जाधव, सारिका शिवाजी भालेराव आणि गजानन भीमराव कल्याणकर यांच्या प्रचारासाठी अंजलीताई आंबेडकर यांनी काल जाहीर सभा घेतली होती. या सभेला मतदारांनी उदंड प्रतिसाद दिला. एमआयएम पार्टी ही भारतीय जनता पार्टीची बी टिम आहे, असा जाहीर आरोप करीत अंजलीताई बाळासाहेब आंबेडकर यांनी सत्ताधाऱ्यांवर प्रहार केले.

# बिलोलीचे माजी आ.गंगाधर पटने यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी) : अग्रेसर समाज कार्यासह ग्रंथालय चळचळीतील व्यक्तीमत्त्व माजी आमदार गंगाधरराव महाळप्पा पटने यांचे रविवार, दि. ११ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून शहरातील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. दरम्यान पटने यांच्या इच्छेनुसार शासकीय रूग्णालयास मरणोत्तर देहदान करण्यात आले.

माजी आमदार गंगाधर पटने यांचा जन्म १४ एप्रिल १९४१ रोजी शेतकरी कुटुंबात बिलोली येथे झाला. पटने हे मूळचे करडखेड ता. देगलूरचे ! पण ते वकिली व्यवसाय निमित्त बिलोलीला स्थायिक झाले. रविवारी सकाळी ८.०५ वाजता उपचारादरम्यान नांदेड येथे खासगी रुग्णालयात निधन झाले.

त्यांनी मरणानंतर देहदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचा देह नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास सुपूर्द करण्यात आला.


**कल्चरलची फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे व्याख्यानमाला: पहिले पुष्प**

# बुद्धाची करुणामय नैतिकताच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन व्हिजनचा आधार : डॉ.सुखदेव थोरात

नांदेड (प्रतिनिधी) : बुद्धाची करुणामय, मानवतावादी आणि विवेकाधिष्ठित नैतिकता हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रिपब्लिकन व्हिजनचा कणा आहे, असे ठाम प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी केले. कल्चरल असोसिएशनच्या वतीने आयोजित फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे व्याख्यानमालेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील रिपब्लिकन व्हिजन या विषयावर पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विठ्ठल खाडे हे होते.

यावेळी मंचावर पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.एस.पी गायकवाड, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, भदन्त विनय बोधीप्रिय महाथेरो, किशोर खांडेकर, डॉ.गौतम कांबळे, संजय शेंडे, विमल नवसागरे, कल्चरल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र गोणारकर, सचिव डॉ.विजयकुमार माहुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.थोरात म्हणाले की, बाबासाहेबांच्या विचारांवर चालणाऱ्या पक्ष व संघटना जर बाबासाहेबांचे विचार प्रमाण



मानत असतील, तर एकाच विचारधारेवर आधारित इतक्या वेगवेगळ्या संघटना का निर्माण झाल्या, हा गंभीर प्रश्न आहे. बाबासाहेबांचे विचारांचे वेगवेगळे आकलन मांडल्या जातो त्यातूनही घडले. असे सांगून विषमतेला कारणीभूत असलेली जात ही केवळ सामाजिक रचना नसून ती एक सुसंगत विचारधारा व तत्त्वज्ञान आहे. जातीचा विचार हा भेद, श्रेणीक्रम आणि वर्चस्वावर आधारलेला असून इतिहासकाळापासून विषमता, शोषण आणि अन्यायाविरुद्ध संघर्ष सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या विषमतेच्या मुळावर घाव घालण्यासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर समतेची रचना उभी करण्याचा विचार मांडला. सामाजिक जीवनात स्वातंत्र्य, समता व बंधुता राजकीय व्यवस्थेत संसदीय लोकशाही, आर्थिक पातळीवर राज्य समाजवाद आणि सांस्कृतिक जीवनात बुद्धाची करुणामय नैतिकता - या चार आधारांवर बाबासाहेबांचे रिपब्लिकन व्हिजन उभे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पान १ वरुन

## शिवसेनेला विजयी करा : ना.उदय सामंत

त्यामुळे ही कल्पना सत्यात उतरवण्यासाठी शिवसेनेचे हाती सत्ता द्या. निश्चितपणे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करून दाखवू असेही ते म्हणाले.

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या नेतृत्वात नांदेड उत्तर मधून जे ४० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत त्यांनाच विजयी करा. शिवसेनेच्या धनुष्यबाणाशिवाय अन्य कुठल्याही निवडणूक निशाणीला मतदान देऊ नका असेही ते म्हणाले. जे लाडक्या बहिणीच्या पंधराशे रुपयाला विरोध करत होते ते आता एकवीसशे रुपये कधी देणार असे विचारत आहेत . परंतु योग्य वेळी एकवीसशे रुपये दिले जातील अशी ग्वाही त्यांनी दिली. नांदेड महानगरपालिकेत मागील काळात सत्ताधाऱ्यांमुळे जी करपलेली भाकरी आहे ती करपलेली भाकरी परतवण्याची जबाबदारी आता नांदेडकरांची आहे. त्यामुळे नांदेडकरांनी ही करपलेली भाकरी परतवावी आणि जनतेला चांगली भाकर देण्यासाठी शिवसेनेला निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले. येणारे ७२ तास अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यासाठी शिवसैनिकांनी आणि पदाधिकाऱ्यांनी मतदारांनी डोळ्यात तेल घालून काम करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.

## ब्ल्यूप्रिंट तयार आहे

आहेत, त्यांना त्यांच्या घराची शासन आता मालकी देणार आहे. महसूलमंत्री बावळकुळे यांच्या दूरदृष्टीमुळे महसूल खात्यात अमुलाग्र बदल, आता अनेक योजना ऑनलाइन करण्यात आल्या. कौठा भागात पूर्वी कोणी जमीन घेत नसे. परंतु, रस्ते व ड्रेनेजच्या सुविधा आणि शासकीय इमारतींची उभारणी यामुळे या भागाचा विकास झाला. त्यामुळे जमिनीचे भाव वाढले. शहरात सभांसाठी मोठे मैदान असावे म्हणून कौठा परिसरात मैदानासाठी जागा उपलब्ध करून दिली.जगात जे जे उत्तम आहे ते माझ्या नांदेडात आले पाहिजे असा माझा आग्रह असतो.केवळ तुमचा आशीर्वाद व मला मिळालेले समर्थन यामुळेच मी राजकारणात यशस्वी झालो. महापालिकेत भाजपाचे नेतृत्व व माझ्यावर विश्वास ठेऊन आपण सत्ता द्याल, हा विश्वास मला आहे.असेही ते म्हणाले.

## काँग्रेसशी बेइमानी करणाऱ्यांना अद्दल घडवा

जनतेच्या हिताचे कुठलेच व्हीजन त्यांच्याकडे नाही, असाही हल्लाबोल त्यांनी केला. काँग्रेस-वंचितने आपल्या जाहीरनाम्यात पुढील पाच वर्षांचा नियोजित आराखडा मांडला असून जाहीरनाम्यात दिलेली सर्व आश्वासने पुर्ण करण्यास काँग्रेस-वंचित आघाडी वचनतबद्ध आहे. विरोधकांनी जुन्या आणि वय झालेल्या त्याच त्या उमेदवारांना उमेदवारी दिली. त्यांचे उमेदवार जनतेच्या अपेक्षा काय पुर्ण करणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. याउलट काँग्रेसने नवतरुणांना, जनतेच्या समस्या जाणून घेणार्या आणि विकासाची तळमळ असलेल्या उमेदवारांना संधी दिल्याचे खा.चव्हाण यांनी स्पष्ट केले.

धनशक्ती विरुद्ध जनशक्ती या तत्वावर ही निवडणूक होत आहे. विरोधकांच्या भूलथापांना तसेच आमिषांना मतदार भीक घालणार नाहीत. पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकण्याचे दिवस संपले आहेत. जनता जागरूक झाली असून मतदार विकासाला, प्रामाणिक उमेदवारांना आणि सक्षम नेतृत्वाला स्वीकारत आहेत. काँग्रेसने शहराच्या विकासासाठी आजपर्यंत केलेल्या कामाची पावती या निवडणुकीत जनता नक्कीच देईल, असाही विश्वास खा.रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. यावेळी श्याम दरक, एकनाथ मोरे, फारुख अहेमद, प्रशांत इंगोले, यशपाल भिंगे यांच्यासह काँग्रेस-वंचित आघाडीचे असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

## पहिल्यांदाच केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी

नवी दिल्ली - देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच केंद्रीय अर्थसंकल्प हा रविवारी सादर केला जाणार आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सोमवारी केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी १ फेब्रुवारी रोजीच सादर होणार असल्याचे स्पष्ट केले.यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण सादर करणार आहेत. संसदेच्या पटलावर त्या आठव्यांदा अर्थसंकल्प ठेवणार आहेत. यंदाचे अर्थसंकल्पीय अधिवेश हे २८ जानेवारी आणि २ एप्रिल दरम्यान दोन सत्रात होणार आहे. केंद्रीय संसदीय मंत्री किरण रिजीजू यांनी याबाबतचा निर्णय सोशल मीडियावर शेअर केला.

हे वृत्तपत्र मालक प्रकाशक संपादक राम गंगाराम तरटे यांनी मुद्रक नरसिंह पांडुरंग घोणे यांच्या मॅजिक पब्लिकेशन शॉप नंबर १० मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स गांधी चौक लातूर जिल्हा लातूर- ४१३५१२ येथे छापून घर क्रमांक १ , मुस्तापूर ता.नायगाव जिल्हा नांदेड ४३१६३२ येथे प्रकाशित केले आहे. RNI NO. MHMAR/25/A2579. Mob. No. 8177826043 , 8600852183.

This News Paper Has Owner, Publisher and Editor Ram Gangaram Tarte, Printed parmeshwar Narsihn Ghonase Magic Printars & Publication shop no.10, manapa shopping complex, Gandhi Chowk, Latur - 451335. Published at 1, mustapur, tq.Naigaon, Dist. Nanded - 431632 ( MS) . RNI NO - MHMAR/25/A2579.